# छंदस्पर्शी

लीला गोविलकर

म. ग्रं. सं. ठाणें
व काव्य
क्र. २४९०



REFBK-0024003
REFBK-0024003

# छंदयात्री

डॉ. लीला गोविलकर

REFBK-0024003
REFBK-0024003

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९०
दा. क्र. २४००३
काव्य १३।७।०३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

पारिजात

**प्रकाशक :**

के. विजय अंबाडे
पारिजात पब्लिकेशन्स्
ब्लॉक नं. ३
५७६, शिवाजीनगर
जंगली महाराज रोड
पुणे ४११ ००४.

दूरध्वनी : ५२८८१

© डॉ. लीला ना. गोविलकर,
एम्. ए. पी. एच्. डी.
'आशिर्वाद', सर्वोदय कॉलनी,
अहमदनगर

**मुद्रक :**

एस्. आर. अग्रवाल
ज्ञानसरिता मुद्रणालय,
८/११ एरंडवणे,
पुणे ४११ ००४.

**मुखपृष्ठ :** दीपक संकपाळ

ब्लॉक/छपाई : व्ही. जोशी, ब्लॉक मेकर्स, पुणे

**मांडणी :**

के. विजय अंबाडे

**प्रकाशन-काळ :** मार्च १९८३

**किंमत : पाच रुपये**

---

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळालेले आहे.

# स्वागत

अंतर्यामीची भावांदोलने आणि हेलावून सोडणाऱ्या उत्कट हळव्या व्यथा यांना शब्दरूप देणारी निखळ भावकविता आज खरोखरच दुर्मीळ झाली आहे. सहृदय रसिकाला अशा भावकवितेची अंतःस्थ तहान नेहमीच असते. म्हणूनच प्रा. डॉ. लीला गोविलकर यांच्या या भावकवितेचे, त्यांच्या या पहिल्यावहिल्या संग्रहाचे मनापासून स्वागत करताना मला विशेष समाधान वाटत आहे.

ही कविता जात्याच भावगर्भ आणि मितभाषी आहे. उत्कट आशय लक्ष्यवेधी दृष्टीने नेमका व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती शब्दांनी जे सांगते, त्यापेक्षा कितीतरी अधिक ती शब्दांआडून सुचवते. हरवलेले चांदणे शोधणारे हे कातर मन व्याधाचा बाण लागून निखळलेल्या चांदणीत आपलीच कहाणी जणू सांगू लागते. उत्कट संवेदनशीलतेबरोबरच जीवन सोशीकपणे जगण्याच्या प्रक्रियेमध्ये एक विवेकी शहाणपण आणि स्वीकारशील संयमही या मनाला जात्याच लाभला आहे. म्हणूनच, हे मन भावोत्कट असले, तरी ' तुझे–माझे नाते संपले ' या भेदक अभिव्यक्तीनंतरही

' काही नाती फक्त क्षणांची,  
काही मात्र युगायुगांची,  
कोणती खरी, कोणती खोटी ?'  
ओळखेना, माझंच चुकलं ! '

अशी प्रामाणिक कबुली स्वतःपाशी द्यायलाही ते कचरत नाही.

व्यथेलाही एक धुंदी असते, एक नशा असते, पण संयमी प्रौढत्वाबरोबर ती वेदनेची धुंदीही अकालीच हरपली, की काय, असे या कवितेतील विवेकी शहाणपण आणि अनुभवाचे चटकन् तात्पर्य काढण्याची प्रवृत्ती पाहून वाटू लागते.

निखळ, सच्चे असे जे काही या कवितेच्या आणि अनुभवाच्या गाभ्याशी आहे, ते सारे अंतःस्थ आहे. यमुनेच्या जळात न्हाऊन निघण्याचे भाग्य न लाभलेला हा घडा तिच्याच पायांशी कोसळतो, त्याचे तुकडे तुकडे होतात; पण तो मनात मात्र एक ओलेती राधा जागवीत आहे. तशीच ही कविता बाह्यात्कारी रूक्ष व्यवहारी, एकाकी जीवन जगत असताना अंतर्यामी मात्र स्निग्ध, आर्द्र भावनेत न्हाऊन निघाली आहे. म्हणूनच, एका असह्य क्षणी विव्हल उद्गार उमटतात :

‘ सारे सोसता, भोगता,
गेली जीवनाची रया,
भावनेच्या तांडवात,
झाली भस्म सारी माया ’

पण हे कटु सत्य अनुभवाला येत असले, तरी ‘ लक्ष लक्ष आठवणींची ’ संगत मात्र अजून सुटलेली नाही, सुटणारही नाही. म्हणूनच, या भावमंथर मनात प्रश्न उमटतो :

‘ कोण्या जन्माची ही पुण्याई ?
केव्हाचे हे माझे देणे ?
किती भरून ओतीशी,
तुझ्या स्वप्नांचे चांदणे ?’

या चांदण्याचीही एक चिरंतन संगत या मनाला लाभली आहे.

‘ त्रा गा ’ सारख्या कवितेत या मनाचे, त्याच्या आंदोलनांचे, भावना-व्यथांचे मोठे भेदक प्रत्यंतर येते. दूर सारलेले स्वप्नभास क्षणमात्र डोळ्यांत दाटतात, गात्रांत साठतात, मनाचे निश्चल पाणी हलू लागते, लाख प्रश्न उमटू लागतात, पण एक क्षण असा येतो, की सारी स्वप्नं दूर फेकून मन पुन्हा शांत होतं, सारी खळबळ तळाशी बसते. आणि मनात एकच सूर घुमू लागतो :

‘ जवळ नको कुणीही ! ’

या मनाला खरी संगत आहे ती एकाकीपणाचीच. एकाकीपण हेच शेवटी संगतसोबत करू लागते. या विलक्षण अनुभवांचीच ही कहाणी आहे.

‘ अ नं गी ’ ही या संग्रहातील एक सुरेख भावपूर्ण कविता. या समग्र कवितेच्या आशयाला विरळा असा एक सफलतेचा, तृप्तीचा, हर्षभरित सूर या ओळीओळीं-मधून उमटत आहे ‘ तुझ्या-माझ्या जीवनाचे अवेळीही सोने झाले ’ या आंतरिक समाधानात न्हालेल्या शब्दांत ही कविता बोलकी होते. कटु स्मृतींचे वादळ आता मागे पडले आहे. पुढे येण्याचे बळ आता त्याच्यातही उरलेले नाही. म्हणून ‘ मागे पाहू नकोस ’ असे ही प्रेयसी विश्वासाने सांगत आहे. पुढे असलेल्या संगराचीही तिला आता क्षिती नाही, त्यालाही ती सामोरी जाणार आहे. व्यवहाराच्या मळ-लेल्या वाटेवर रुळलेले हे मन अभावितपणेच, स्वतःच्याही नकळत स्वतःतून कधी, कसे निसटले आणि स्वप्नांनी त्याचा ताबा कसा घेतला, हे त्यालाच कळले नाही, हे प्रांजळ विश्वासाने सांगणारी ही कविता मनाची पकड घेते. चांदण्याचे श्वास

आणि कळीचा सुगंध घेताना रमलेले हे मन व्यवहाराच्या वाटेला नकळताच पारखे झाले, या आविष्कारात नितांत सहजता आणि विश्वासकता आहे. हे मन भावजीवी, प्रेमजीवी आहे. प्रीतीच्या – न लाभलेल्या प्रीतीच्याही धुंदीत ते तरंगत, रंगत राहिले आहे. ही कविता कधीकधी अतीव साध्या अशा सहजसौंदर्याने मनाचा ठाव घेते :

‘ तुझे-माझे, माझे-तुझे,
आता संपला दुरावा,
किती दूरची जवळीक,
आली शिंपीत गारवा. ’

या ओळी वानगीदाखल पाहा.

‘ वेड्या आषाढाने आता,
कसा सावरावा तोल ? ’

हा प्रश्नही मनाचा असाच ठाव घेतो,

स्वतःच्याच अंतर्मनाशी संवाद चालावा आणि तोच स्वगत होऊन बाहेर उमटावा, तशी आत-आतली व्यथा ‘ दुबळी ’ सारख्या कवितेतून भेदकपणे व्यक्त होते. ‘ अलीकडे माझी मलाच मी टाळत असते ’ हा प्रारंभच आपल्याला अंतर्मुख करतो.

‘ फार भिते मी माझी मलाच,
कोण भिणार नाही असल्या पडछायेला ?
भविष्यात तरी या भुताने मला घाबरवू नये.
म्हणून स्वतःभोवती उभी करते
माणसांची वर्तुळे,
– मांत्रिकाने मंतरलेल्या तांदळांसारखी. ’

या ओळींतून विलक्षण कठोर आणि उघडी होऊन बाहेर पडलेली ही जगावेगळी व्यथा आणि तिला पेलून धरणारी मांत्रिकाच्या तांदळांची तितकीच भेदक पण अर्थवाही कल्पना-प्रतिमा मनावर खोलवर आघात करते.

‘ या वाटेला ना आदी, ना अन्त,
– आणि पळणाऱ्या मलाही. ’

हा या कवितेचा शेवटही मनाला विलक्षण छेद देऊन जातो. एकाकीपणाची न संपणारी पोकळी या भावप्रवण मनाला आतून पोखरत आहे, याची जाणीव या शब्दाशब्दांतून तीव्रपणे होते. ' आपलं मनच आपल्याला फितूर होतं. ' हे सांगणारी ही कविता,

' कुठल्या तरी बेटावर राहणारं हे मन,
कशाला, कोण जाणे,
इथं वसतीला येतं.
– आणि माझ्या घरात मीच परकी होते. "

या, स्वत:शीच बोलावे, अशा उत्कट शब्दांत आपलं मनोगत सरळ प्रांजळपणे सांगते आणि ती अकृत्रिम प्रांजळताच मनाला खोलवर स्पर्श करते.

' चांदण्याच्या खेळातल्या सावल्या हातांत आल्या नाहीत, पण हाताची सावली मात्र स्वत:लाच हसत राहिली ' हे विखारी सत्य इथे घट्ट मनाने पचवावे लागते.

' फसवणूक 'सारख्या सरळपणे वेध घेणाऱ्या कवितेतील संयत कारुण्यही मनाचा ठाव घेतल्यावाचून राहत नाही,

' मी हसवीत नसते तुम्हांला,
मी रमवीत असते मलाच,
माझ्याच वेगवेगळ्या पैलूंनी फुलवू बघते मनाला. '

स्वत:च स्वत:ला फुलविण्याची, रमवण्याची ही निकड या कारुण्याच्या मुळाशी आहे. मग ' असे सोसणे– असे भोगणे ' हाच जगण्याचा अर्थ असावा, असा निष्कर्ष हे मन काढू लागते; आणि तो कळल्यानंतर तरी जगण्याचे सोने होईल का, या केविलवाण्या प्रश्नातील अगतिकता मनाला व्यथित करते. ' मोहोरावरच्या या जळलेल्या खुणा ' हीच मग जन्माची सोबत वाटू लागते, आणि जीवनाचे सत्य कदाचित तेवढेच असेल, ही जाणीव या मनाची संयत विषण्णता आणि गंभीर स्वीकारशीलताच व्यक्त करते.

' सरो कधी सरणार,
आकाशाची ही गळती,
क्षणाक्षणाला आटते,
माझी अन्तरीची शक्ती. '

या व्याकूळ उद्गारातही मनाचा अपार शीण जाणवत राहतो.

अवघ्या चार-चार ओळींच्या काही भाववाही कणिकाही या संग्रहामध्ये आढळतात. भावनेची, व्यथेची, चिंतनाची एकेक छटा त्यांमध्ये अलगद सामावलेली आहे.

‘ या ललाटरेषा, बोलून गेल्या
भाग उद्याचे आज.
अन् मनात माझ्या, घुमू लागती,
शब्दांचे पखवाज. ’

किंवा

‘ माथ्यावरती आभाळ पेलायचं असेल,
तर स्वप्नांचे उखाणे विसरावे लागतात,
– आणि स्वप्नच पेलायचं असेल, तर ?
तर आभाळालाच उखाणे लागावे लागतात ’

ही उदाहरणे पाहा. ‘ उद्या ’ सगळ्याची शाश्वती, तृप्ती, मुक्ती मिळणार असली, तरी त्यामुळे हे मन ‘आज ’च्या अतृप्तीच्या दाहातून सुटू शकत नाही. चुकलेला वाटसरू मला मार्ग विचारतो आहे, पण मीच इथे चुकलेली आहे, चालणंही माझ्या हाती उरलेलं नाही, हे सांगायलाही इथे शब्द अपुरे पडतात. अशा वेळी वाट चुकलेल्या वाटसरालाच व्याकूळ हाक घातली जाते :

‘ नेशिल ना पैलतिरा ?’

‘ मीच इथे चुकलेली ’ या कवितेतील ही भावअर्थगर्भता मनाचा ठाव घेतल्यावाचून राहत नाही. एकाच वेळी तीव्र, दारुण निराशा आणि अंतरीचा गाढ अतूट विश्वास या कवितेत हातात हात घालून एकत्र नांदताना दिसतात. ‘ या मृत्युगोलात भोवळ येईपर्यंत भिरभिरत राहिल्याशिवाय दुसरी गती नाही. ’ असे विषण्ण, निर्वाणीचे उद्गार काढणारे हेच मन

‘ आता चालताना पुढे,
नाही अंतरात भय,
तुझी जागती पापणी.
तिची पावलांना सय ’

अशी निःशंक विश्वासाची स्वतःलाच पटलेली खूणही शब्दांतून व्यक्त करते कारण जगण्याच्या आणि सोसण्याच्या या अटळ प्रक्रियेतही या मनाची आंतरिक. शक्ती, तिचा अखंड वाहता झरा कुठेतरी अबाधित राहिला आहे. त्यातूनच या कवितेला, तिच्या भावाशयाला हे संमिश्र स्वरूप लाभले आहे.

या कवितेच्या भाषेचा स्वतंत्र विचार करण्याची इच्छा होत नाही. कारण तिला तसे स्वतंत्र अस्तित्व नाही. ती या कवितेच्या सहजोद्गाराचीच स्वाभाविक भाषा आहे. तिला वेगळे अलंकरण लाभलेले नाही, कवितेच्या भावाशयातच तिचे अस्तित्व बिंबलेले आहे.

'छं द या त्री' असे साधे पण अन्वर्थक नाव डॉ. लीला गोविलकर यांनी आपल्या या संग्रहाला दिले आहे; आणि खरोखरच ही एक उत्कट व्यक्तिमनाची, त्याच्या पालटत्या भावावस्थांची, आशा-निराशांची, ऊन-पावसाची कविता आहे. ती पूर्णतया व्यक्तिगत असली, तरी तिचे अनेक सूर आपल्याही अंतःकरणाच्या तारा छेडल्यावाचून राहत नाहीत.

ही कविता कवयित्रीच्या जीवनसंगतीत अशीच विलसत राहो, हीच सदिच्छा !

**– अनुराधा पोतदार**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९०
दा. क. २४००२
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## शोध-चांदण्याचा

शुक्राची चांदणी
व्याधाचा बाण लागून
खळकन् निखळली;
बघता बघता
एक खडबडीत उल्का बनली.

तेव्हापासून मी शोधतेय्
माझं हरवलेलं चांदणं...

## माझंच चुकलं !

द्यायचं, ते देऊन चुकलं
घेता आलं, ते घेऊन झालं...
कसल्या अपेक्षा ? कसली उपेक्षा ?
तुझं-माझं नातं संपलं !!!

काही नाती फक्त क्षणांची
काही मात्र युगायुगांची
कोणती खरी ? कोणती खोटी ?
ओळखेना... माझंच चुकलं...

## घड्याच्या मनात

तिच्याही माथ्यावरचा घडा
एकदा फुटला होता
खटचाळ कृष्णाच्या खोडकर खड्यांनी.

–पण
यमुनेच्या मदभऱ्या जळात
न्हाऊन निघण्याचे भाग्य
लाभले नव्हते घड्याला,
म्हणून
कोसळला बिचारा
तिच्याच पायाशी
तुकडे
तुकडे...
होऊन
तिच्या ' कोरडे 'पणाची कीव करीत
आणि
मनात ओलेती राधा जागवीत...

## पुण्याई

गेले आयुष्याचे दान
आता उरले न काही
दिल्या-घेतल्याचा मुळी
मला हिशेबच नाही...

झाल्या भावना निर्माल्य
त्यांनी कशी बांधू पूजा ?
खुळचा पूजेसाठी लागे
हार गुंफलेला ताजा

सारे सोसता, भोगता
गेली जीवनाची रया;
भावनेच्या तांडवात
झाली भस्म सारी माया...

तरी रेताड उन्हाळा
शिंपितोस कशासाठी ?
लक्ष लक्ष आठवणी
बांधतोस कशासाठी ?

कोण्या जन्माची पुण्याई...
केव्हाचे हे माझे देणे ?
किती भरून ओतीशी
तुझ्या स्वप्नांचे चांदणे !

## ‘उद्या’चे स्वप्न

जीवनातली वसंत-स्वप्ने
ग्रीष्माच्या दाहात करपली
आणि अवेळी मनात माझ्या
निर्माल्याची रास साठली...

हवेत विरले स्वप्नमनोरे
धुक्यात विरली त्यांतिल दु:खे;
आणि ‘उद्या’चे स्वप्न भयानक
मनात माझ्या फुलवी काटे...

## त्रागा

कुठल्या तरी क्षणांचे
गुंफून गीत साधे
मी चालले कधीची
विसरून प्रीतिधागे

क्षणकाल काहि दाटे
स्वप्नासमान नेत्री,
ते दूर सारिलेले
येतात भास गात्री...

शेवाळल्या मनाला
पुसतात लाख प्रश्न
हलते मनात पाणी
होई व्यथीत कृष्ण

...फेकून दूर स्वप्ने
मन आज शांत होई;
मनि सूर एक घुमतो...
जवळी नको कुणीही...

## अनंगी

शुभ्र चांदण्यांचे झेले
आज अमृताने न्हाले
तुझ्या–माझ्या जीवनाचे
अवेळीही सोने झाले...

पाहू नको मागे, मागे
उभे स्मृतींचे वादळ
आता त्याच्यापाशी नाही
पुढे येण्याचेही बळ

दु:ख विरले सुखात
सुख झाले सप्तरंगी;
पुढे असू दे संगर
मीच जाहले अनंगी...

## अजूनही

मी स्वप्नांचा हात
कधीच धरला नव्हता
व्यवहाराची वाट चालताना
माझे पाय
कधीच कुरकुरले नव्हते

पण काय नि कसं घडलं...
माझ्या मनाचा ताबा
स्वप्नांनी कधी घेतला
मला कळलंच नाही...
मला कळलंच नाही
त्याच्या हातात
हात देऊन हिंडताना
माझ्यातून मन कधी निसटलं...

कुठल्या तरी तंद्रीत
ते तासन् तास
रंगून जाई...
नको त्या वाटेने हिंडताना
ते चांदण्यांचा श्वास घेई.
कळी उमलायच्या आधीच
फुलामधील सुगंध होई...

...आणि
माझ्या पायांखालची
व्यवहारी वाट
कधी हिरमुसली
मला दिसलीच नाही.

...जेव्हा कळलं, तेव्हा...
माझ्या बरोबरच्या माणसांनी
स्वत:साठी उबदार कोष
विणले होते;
त्यांच्या सभोवती होता
प्रतिष्ठितांचा दरबार...

माझं मन मात्र
स्वप्नांचे कुंचले
अजूनही
टाकत नाही,
चांदण्यांचे झुले
सोडत नाही,
वाळूतली वाटचाल
विसरत नाही...
वेणुवनातील बासरीची
एकदा प्यायलेली धुंदी...
–कृष्ण संसारी झाला, तरी
उतरत नाही...

## जखम अगोचर

वाऱ्यावरती विरून गेले
गंध नवोदित तव प्रीतीचे
सुकून गेल्या मंगल आशा
आजवरीच्या मनि जपलेल्या

कल्पनेतले जग सोनेरी
बघता बघता जळून गेले
आजवरीच्या स्वप्न-कल्पना
फोल पसारा, कळले सारे

–फुलवशीलही परत फुलोरा
विसरुनि हा जळलेला मोहोर
विसरशील का सांग परंतु
हृदि जपलेले स्वप्न मनोहर ?
–ती झालेली
जखम अगोचर ?

## अलगद पापणि ओघळते !

तुझ्या प्रीतिचे सूर चंदनी
मनात मी तर बावरते
कुठे, कधीची स्मरुनि बासरी
मनोमनी मी विरघळते...

हसते, फुलते जगात तरिहि
तुझ्या मिठीतच दरवळते ;
तुझ्या दिठीची धुंद मोहिनी
सदैव तीतच तरंगते...

तरंगते, रंगते सदाची
जन्मच हा, रे, विस्मरते
कुठल्या जन्मीचा स्वरसंगम
अलगद पापणि ओघळते...

## तृप्ती

लक्ष अलंकार ल्याले
तुझ्या दिठीत, मिठीत
माझ्या अंगारांची चव
तुझ्या बोटांत, ओठांत...

तुझे माझे, माझे तुझे
आता संपला दुरावा
किती दूरची जवळीक
आली शिंपीत गारवा...

## अनादि-अनंत

किती अंतरे दूर चालून आले
किती योजने टाकली मागुती
किती संकटे पाहिली, साहिली अन्
तरी ना मना जाहली विस्मृती

किती भेटले यात्रि मार्गात मजला
रुपांनी, गुणांनी जरी उज्ज्वल
परी रेखिलेली तूझी मूर्त त्याची
कुणाला कशी यावयाची सर ?

तुला पाहिले, अन् किती लोभले मी
नाही तयाची तुला कल्पना
तुझी विविध रूपे मनी पूजिते मी
सदा व्यापुनी राहशी मन्मना

लौकीक केला दुरी या मनाने
प्रतिष्ठा नसे, शांतिही ना मिळे
तृप्तीविना त्याग, हे दुःख दैवी
कशाला असे कोणि हे लादले ?

तुझ्यावीण नाही दुजा अर्थ मजला
तुझ्या चिंतनी, स्वप्नि मी रंगते...
अणूरेणु व्यापून हे वेधणारे
कशाला असे वेड हे लागते ?

नको दूर जाऊ मनातून आता
तुला पाहु दे, रे; तुला ध्याऊ दे...
अनामीक या प्रेमरंगात मजला
रुपांनी तुझ्या नित्य, रे, न्हाऊ दे...

## कसा सावरावा तोल ?

झाडे झाली वेडी खुळी
वेली न्हाताना पाहून...
रास रंगतो सरींचा
वारा बेभान झिंगून

पावसाळी मेघमाला
आकाशाला बिलगुन
त्याच्या अंतरीची खुशी
वीज लवते लाजून

उधाणला हा सागर...
आवरतां आवरेना
चंद्रकिरणांचा शेला
त्याची किनार गवसेना...

कोण्या धुंद आवेगात
रंगे अनंगाचा खेळ...
वेड्या आषाढाने आता
कसा सावरावा तोल ?

## ओळख

अनोळखी या वळणावरती
तुझी नि माझी भेट घडे
मनात नसता तसले काही
कशी अचानक भूल पडे...

मनात नव्हते स्वप्न दिवाणे
उरात नव्हती कसली व्यथा
सहजपणाने आधारास्तव
नकळत आले हात हाता

करात येता अनोळखी कर
सगळे ओळखीचे बनले
मनी गुंतता अनोळखे मन
स्वप्नांनाही भान आले...

अनोळखी त्या वळणावरती
अनोळखी ती भेट घडे
मनात नसता तसले काही
कल्पसुमांशी जीव जडे

## ताल... तोल

न पेलणाऱ्या सुरांमध्ये
जेव्हा गावं लागतं,
तेव्हा
चुकलाच, तर चुकू द्यावा
ताल;
पण नये कधी सुटू
तोल...

## सूर ‘ काल’चे

स्वप्नील धुक्याचे लेवुनि स्वप्न–उखाणे
मी गाऊ बघते एक अनोखे गाणे...

मी विसरू म्हणते, सूर ‘ काल’चे ‘ आज ’
वेधतो ‘ काल ’; पण उद्या... उद्याचा बाज.

तंद्रीत तरीही मीच मला फुलवीते
‘ काल’च्या सुरातच गीत ‘ आज’चे विरते

कळते न मला कधी का ‘ ते ’ गाणे माझे ?
पेलणार कुठवर मी तरि त्याचे ओझे ?

येईल कधीतरी ‘ तयास ’ माझी कीव
तेव्हाच गायचा मुक्तपणे हा जीव

## दुबळी

अलीकडे माझी मलाच मी टाळीत असते
माझी छाया मला दिसू नये
एखाद्या कल्पनेमधूनही,
म्हणून अष्टौप्रहर पसारा मांडते कामाचा.

फार भिते मी माझी मलाच.
कोण भिणार नाही असल्या पडछायेला ?
भविष्यात तरी या भुताने मला घाबरवू नये
म्हणून स्वत:भोवती उभी करते माणसांची वर्तुळे...
मांत्रिकाने मंतरलेल्या तांदळासारखी.

पण कितीही टाळले,
तरी एखाद्या वळणावर
मी दिसतेच
मला–
करुण,
        केविलवाणी,
                अगतिक...
कुणाच्या तरी दयेची भीक मागणारी
भीक मागणारी;
कुठल्या तरी बंद दाराकडे
आशाळभूतपणे पाहणारी.

युगायुगांची अतृप्ती डोळ्यांत आणून
मी मागत असते...
पण माझेच शब्द गुदमरतात
माझ्यासारखेच.

कळेनाशी होते मीच मला.
फक्त जाणवतं एवढंच–
पळतेय् मी
माझ्यापासून दूर, दूर, दूर...

–या वाटेला ना आदी
ना अंत;
–आणि पळणाऱ्या मलाही !

## पाय नुसते चालत असतात !

हेच हवे होते
ते नकोच होते
असे चालायचे होते
तसे जगायचे नव्हते;
पण
जीवनाचे एक चाक
नेहमीसारखेच निखळले होते,
भुईनेच गिळले होते
हे मात्र कळले नव्हते.

बहरलेल्या जगण्याला
अमर करण्याच्या नादात
कोणी एक पिता
पुत्राजवळच
तारुण्याचे वरदान मागतो.
अवेळी उमललेल्या लालस स्वप्नांना
पकडून ठेवण्यासाठी
कुणी एक नादिष्ट
पुत्रालाच
आजन्म ब्रह्मचर्याची शपथ
घ्यायला लावतो.

पण स्वप्नं पांगुळतातच.
त्यांचा ध्यास घेणाऱ्यांना मात्र
केविलवाणं करतात.
हे मात्र कळलं नव्हतं.
कळलं नव्हतं, कळत नसतं,
–आणि जेव्हा कळतं, तेव्हा फार फार
उशीर झालेला असतो.
स्वप्नांच्या दुनियेतून
मागे वळायचे मार्ग
केव्हाच संपलेले असतात.
दारं बंद झालेली असतात !

काय हवे होते ?
काय नको होते ?
कसे चालायचे होते ?
कसे जगायचे नव्हते...?

काही काही आठवत नसतं
पायांखाली रेखलेली वाट
मान खाली घालून
पाय नुसते चालत असतात,
पाय नुसते चालत असतात...

## बहर कसा ये फुलां ?

कुणा न कळते व्यथा मनीची
कुणा न कळते प्रेम
कशास फुलती पानोपानी
उगा दवाचे थेंब ?

उगाच हसते, उगाच फुलते
मन परी हे कोरडे;
तृणपर्णांचे दवबिंदूंशी
नाते कधि का जडे ?

कोणासाठी येता बहरून
दुजा व्यथेने रडे
माझ्यापुढती प्रश्न पडे, की
घालु कुणा साकडे ?

मी नच उरते, जरी नच सरते
कोडचासम मी मला
सगळचांवाचुन, सगळचांसह परी
बहर कसा ये फुलां ?

## फसवणूक

मी
हसवीत नसते तुम्हांला
मी रमवीत असते
मलाच–
माझ्याच
वेगवेगळ्या पैलूंनी
फुलवू बघते मनाला.

तुम्ही फुलता
माझ्या कल्पनांनी,
तुम्हीं हसता
माझ्या विनोदांनी
तुम्ही भुलता
माझ्या विभ्रमांनी.

पण
आतल्या आत,
कुठेतरीं असलेली
पोकळी...
लांबच लांब पसरलेल्या
माळरानावर
हिरवळीचे आच्छादन पेरण्याचा
करीत असते मी
खुळा प्रयत्न.

## कवाडे बंद

पायांशी आलेल्याला
उचलून पोटाशी घेणे
हा तर तुझा स्वभावधर्म...

पण
तोच तुझ्या मस्तकावर
बसू लागला; तर
तू अस्वस्थ होतेस.
तुझ्या मायेची कवाडे
बंद होतात.

कारण
तुझा नितळ, निळा भालप्रदेश
असतो फक्त
चंद्रासाठी.

## जगण्याचा अर्थ

आदर्शांची प्रचंड चौकट
कधि फोडावी, कधी रचावी
जळत्या उल्का हाती धरता
आदर्शांची राख गिळावी...

फुलण्यास्तव कधि विरण्यास्तवही
स्वप्नांचे साम्राज्य बघावे
हसता फुलता, फुलून हसता
रडण्याचेही भान गळावे...

—जगण्याचा हा अर्थ असावा
असे सोसणे, असे भोगणे !
या सगळ्याचा अर्थ उमगता
जगण्याचे का होईल सोने ?

## रस्ते जेव्हा बेइमान होतात ...

सगळेच रस्ते
जेव्हा बेइमान होतात,
तेव्हा मन बांधतं
आशेची रंगीन मंझिल
तिला असतो इंद्रधनूचा पूल,
मेघांच्या मखमली पायऱ्या...

नक्षत्रांच्या वर्षावात
सम्राज्ञीच्या तोऱ्यात
हूकुमामागून हुकूम...
–तिथल्या स्पर्धेत
विजय असतो, तो माझाच,
असलाच पराभव; तर
त्याला किनार असते उदात्ततेची...

–आणि ही स्वप्नांची कवचकुंडलं घालून
जेव्हा मी माझं पाऊल
मिजाशीत रस्त्यावर टाकते,
तेव्हा रस्तेसुद्धा
माझे पाय चाटू लागतात–
इमानी कुत्र्यासारखे !

## धर्म मृगजळी जळण्याचा !

छायेची जरी नसे अपेक्षा
हवा निवारा घरट्याचा;
वैराणाच्या जगातही या
धर्म मृगजळी जळण्याचा...

अंधाराला नसते पर्वा
तरीही हाती हवी पणती
अंधारातुन मार्ग काढता
मनास थोडी विश्रांती !

हसणे रुसणे अर्थशून्य जरी
पाण्यावरचे चित्र जसे
रात्रीच्या पण स्वप्नांसाठी
लक्ष पऱ्यांचे हवे पिसे...

## मन

कुठल्या तरी बेटावर
राहणारं हे मन
कशाला, कोण जाणे,
इथं वसतीला येतं,
—आणि माझ्या घरात
मीच परकी होते.

ऐकायचं नाही, म्हटलं, तरी
त्याची प्रत्येक इच्छा
तत्परतेने झेलतात माझेच श्वास !
मानायचं नाही, म्हटलं; तरी
त्याच्याच अबोल तालावर झुलतात
माझ्या सुरांचे दिमाखदार पक्षी...

—असलं मन मला नको आहे.
मुळीसुद्धा नको आहे !
त्याचं बोलणं अगदी गावढळ असतं,
त्याचं सगळंच वर्तन रासवट असतं,
सभ्य जगाचे रीतिरिवाज
त्याला कळतच नाहीत;
मातीमध्ये त्याचे पाय
कधी रुजतच नाहीत.

—पण ते निघून जाईल,
अशी शंका जरी आली,
तर माझी मीच
थाऱ्यावर राहत नाही,
वेडीवाकडी होऊन
कोसळून पडते
अर्धांग झालेल्या दुबळ्या
माणसासारखी...

## जन्माची सोबत

गळयातली तान
गळयाबाहेर उमलण्याआधीच विरते.
स्वप्नांचे पक्षी
स्वत:लाच कुरतडू लागतात.
पायांखालची वाटच
निराधार बनते
आणि मनाचं मनपणच वितळून जातं
वाटतं, काहीच नको.
मिळालं, न मिळालं– दोन्हीही सारखंच
सगळाच अंधार–
कधी गडद, कधी फिका.

शून्यात भोवंडत असतानाच
कुठेतरी परत फुटतात
अभिलाषेची पानं
विरलेली तान
विरता विरताच
दुसऱ्या तानेला जन्म देऊन जाते.
अमेच्या रात्रीलाही
चांदण्यांचा चुरा चिकटतो.
ओसाड माळावरही
एखादी तुळसमंजरी
लाजत लाजत फुलते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९०
दा. क्र. २४००२
तारीख १३।७०।
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

पण सवयीने तिला हात जोडतानाही
मन कासावीस होतं
कोणतं खरं ? कोणतं खोटं ?
जळलेल्या वेलीला मोहोर आला,
हे खरं, की खोटं ?
वेल जळली होती, हे तरी खरं,
की खोटं ?
मोहोरावरच्या या जळलेल्या खुणा ?
ती मात्र आता माझी
जन्माची सोबत आहे.
कदाचित, हे;
आणि हेच तेवढं खरंअ सेल,
असलंच, तर...

## निराधार

माझ्या थिटचा पंखांनी
माझी कायासुद्धा
मला झाकता येत नाही,
तिथे तुला कुठे आधार देऊ ?

—आणि तू तर
दूर दूर निघून गेलास
लांबवरचे वादळवारे
कायमचे माझ्या मनात लावून…

आता संपलेले पंखच
खूप फुलविते—
काचलेल्या मनाला लपविण्यासाठी

## खेळ

चांदण्यांचा खेळ पकडण्याचा
मी प्रयत्न केला
पण
माझ्या हातात
सावल्यासुद्धा आल्या नाहीत...

माझ्या हाताची सावली मात्र
मला हसत राहिली !

## निर्मिती

सुटलेला तोल असा
आज पुनः सावरला
स्वप्नांच्या बाळमुठीत
पदराचा शेव खुळा...

थकलेल्या अंतरास
श्वासांची ऊब मिळे
जुळणाऱ्या मानसास
विश्रांतिस्थळ कळले...

हसण्याचे बळ नसता
ओठांवर लक्ष फुले;
या अशाच क्षणिकांनी
जगण्याला मोल मिळे...

## ह दुःख अंतरीच

सारे कळे, तरीही
कळणार काहि नाही
सारे मिळे, तरीही
मिळणार काहि नाही

ती आस जीवनाची
अपुरी अशीच राही,
ही वंचना सदाची
कधि संपणार नाही...

# अगतिक

किती काळ तग धरू
पागोळ्यांच्या या पांदीत ?
किती वेळ दु:ख साहू ?
थंडी भरते पंखांत...

पलीकडे ते घरटे
त्याचा आठव मनात
सुगंधाचे मोहोळ
एका पंखाच्या झेपेत...

पावसाची झडपणी
घाबरवी या पंखांना
साद घुमते आशेची
घरट्यात प्रेम, कान्हा...

सरो, कधी सरणार
आकाशाची ही गळती
क्षणाक्षणाला आटते
माझी अंतरीची शक्ती...

## छंदयात्री

तो छंद एक होता
स्वप्नात जागण्याचा
जागेपणी तरीही
स्वप्नात रंगण्याचा...

ते वेड एक होते
वेडेच वयही होते
धुंदीत चालताना
जग सर्व तुच्छ होते

माझेच सर्व होते
मजला हवे तसेच
होत्या तशाच लहरी
रुसवेहि ते तसेच

रात्रीतल्या क्षणांची
दिवसास साथ होती
दिनरात धावताना
जगण्यात तृप्ती होती

ती तृप्ति आज गात्री
ती धुंद जाग नेत्री
अनमोल छंद माझा
मी एक छंदयात्री

## आगळा संसार

आगळा राधेचा संसार
तिचे न केले कुणी स्वयंवर
नकळत पुजिला मनि राजेश्वर
अलौकिकाचे वेड अलौकिक
अंकुरले हळुवार ॥ १ ॥

भक्ति जयावर, प्रीति जयावर
सजविते न ती त्याचे मंदिर
परंतु तिचिया मनात फुलते
अमोल ते घरदार ॥ २ ॥

चार भिंतींचे सजवित घरकुल
कापित जाती बासरीचे सुर
असून सारे, घर नच देते
राधेला आधार ॥ ३ ॥

मन हिंदळते सुरासुरांवर
देह बने बासरीच सुस्वर
राधाराणी विसरुन जाते
जगताचा आचार ॥ ४ ॥

## प्रतीक्षा

येशील, हरी, नेशील घरी
कर धरुनी, हीच अपेक्षा
मी करिते तुझीच प्रतिक्षा ।। धृ ।।

तुजवीण न जीवनी तृप्ती, रे
तुजवीण न जीवनी मुक्ती, रे
तुज सांगू कसे ? तुजवीण नसे
कसलीही दुजी मज आकांक्षा
मी करिते तुझीच प्रतिक्षा ।। १ ।।

मनि जगते मी तर कुंजवनी
स्वप्नात होऊनी तव राणी
तुजवीण कसे काही न सुचे ?
दे सहवासाची मधु भिक्षा
मी करिते तुझीच प्रतिक्षा ।। २ ।।

पाहते वाट त्या समयाची
होईल पूर्ती कधी स्वप्नांची
ही भावफुले फुलतील त्वरे,
आतुर, सावळ्या, तव स्पर्शा
मी करिते तुझीच प्रतिक्षा ।। ३ ।।

येशील, हरी, नेशील घरी
कर धरुनी हीच अपेक्षा
मी करिते तुझीच प्रतिक्षा ।। धृ ।।

## स्वप्नात एक राधा

गेला कधीच कृष्ण, विसरून प्रेमबंधा
येथे मनात फुलते, स्वप्नात एक राधा ।। धृ ।।

येईल गोकुळीचा
तो चित्तचोर माझा
फुलवील चांदणे अन्
बोलून प्रेमवाचा
ही आस अंतरीची फुलवीत प्रेमगंधा
येथे मनात फुलते, स्वप्नात एक राधा ।। १ ।।

त्या भेटल्या अनेक
भामा नि भक्त मीरा
माझ्याविना परी ना
त्याच्या मना निवारा
म्हणुनीच मीच त्याची, ही भावडीच श्रद्धा
येथे मनात फुलते, स्वप्नात एक राधा ।। २ ।।

आल्या जुळून तारा
आता न दूर होणे
गेला असेल कृष्ण
परतून त्यास येणे
विश्वास हा खुळीचा, की अमर प्रीतिगाथा ?
येथे मनात फुलते, स्वप्नात एक राधा ।। ३ ।।

## कृष्ण तो केवळ राधारती

सांगुनि गेला राधेसाठी अविनाशी प्रीती
कृष्ण तो केवळ राधारती
कृष्ण तो केवळ राधारती ।। धृ ।।

गोकुळातला तो जगजेठी
शोधित होता अपुली शक्ती
राधा नामे त्यास भेटली एक प्रेममूर्ती
कृष्ण तो केवळ राधारती ।। १ ।।

गोकुळातले बाल्य संपता
गोकुळ उरले स्वप्नी आता
प्रेमस्मृतीच्या लाखो स्मरणी कृष्णमनी जगती
कृष्ण तो केवळ राधारती ।। २ ।।

पुढे कुठे नच जनात भेटी
स्वप्ने मनिची मनी बहरती
राधेविण नच तरी कृष्णाला,
कुणीही कधी स्मरती
कृष्ण तो केवळ राधारती ।। ३ ।।

आस प्रेमिका सहवासाची
तीहि त्यागिली त्याच्यासाठी
दूर राहुनी नित सहवासी, कृष्णसखी जगती
कृष्ण तो केवळ राधारती ।। ४ ।।

मीरेसम नच ज़हर प्राशिले
भामेसम नच त्याला तुळिले
'तू देशिल, ते माझे जीवन' त्यातच तिज तृप्ती
कृष्ण तो केवळ राधारती ।। ५ ।।

## शोध

नकळत जुळता कर, गोपाळा
स्मरण तुझे, पण तुझे न होते
कुठल्या तरी मोहात रंगुनी
सारे सारे उधळुन जाते

उधळू जाते सारे गोकुळ
उधळू जाते वेडी राधा
उधळुन बसते रंगबावरी
युगायुगाची जीवनबाधा

होऊ बघते मीरा मधुरा
तू गिरिधर, मन तुला न भजते
मनी कुणाची बाधा होउनि
तुला, मलाही विसरुन बसते

विसरुनि जाते, तुझी जरी मी
नाव, गाव मज, तरिहि अनामी
जहर पचविते, अग्नित शिरते
मिळेन का, रे, मजला मी तमी ?

## कळे न मज

मी स्वप्नांना दूर सारिले
'जगण्या'चे यश मिळण्यासाठी
आणि माझिया फाशांमधुनी
लौकिकातले सांधे जुळती

अलौकिकाचा उदास चेहरा
आज परी मन व्याकुळ करतो
लौकिकातले यश हाताशी
तरीही 'सूर' बेसूर लागतो

...यमुनेच्या अंतरात न्हाती
सुरासुरांच्या नाजुक लगडी
श्यामल संध्या कातरवेळी
हरखुनि गेली राधा भोळी

तिला मिळाली अबोल तृप्ती
व्यवहाराला दूर सारिता
मला मिळाले शंख-शिपले
माझ्यातील 'माझेपण' सरता...

काय हवे मज? कसे मिळवु मी?
कळे न मज, मी जरी यशस्विनी...
हिंदकळता घट...भिजती बिल्वर
तरंगते मन यमुनेवरती...

## राधेचा घडा

यमुनेच्या मनमोही जलात
पोहत जाणारा हा घडा
लाटालाटांना फुलवीत असला, तरी
तो त्यांचा नसतो.

त्यांच्या तालावर झुलत असला, तरी
त्याचा ताल वेगळाच असतो
त्याचा ताल नि तोल
गुंतलेला असतो
किनाऱ्यावरच्या वाळूत बसून
स्वप्नांची मालिका जपणाऱ्या
राधेच्या श्वासांत

सभोवती फेर धरणाऱ्या लाटांचा
तो कुणीच नसतो
तो असतो फक्त
स्वप्नतंद्रा राहीचा वल्लभ...
तिच्या माथ्यावर विसावण्यात
त्याचे सार्थक असते...
तिथे असतानाच फुटणे
हे त्याचे स्वप्न असते...

या स्वप्नात रंगत
दूर दूर जाणारा घडा...
त्या स्वप्नात रंगत
वाळूत बसलेली राधा...

## विसावा

घेते तुझ्याच नावा
येते तुझ्याच गावा...
मज लाभला तुझ्यात
शतजन्मीचा विसावा

## भाग्य

तव अधरांवर
सदा स्थिरावी
मम अधरांची दले
– भाग्य हे असे जगावेगळे

## काहूर

तुझ्या–माझ्या जीवनाचे
आज जुळलेत सूर
तरी कशास घोंगावे
वेडचा मनात काहूर ?

## बहाणा

'नको, नको'ची गुंफुन गुंफण
'हवे हवे'चे सुचवित कोंदण
'नेती' म्हणुनही पटते शक्ती
भावभक्तीचे असता हे बळ

## तहान

कुणाच्याही ओंजळीतले पाणी पिऊन
तहान भागत असती,
तर जगात महती उरली असती
फक्त पाण्याची

## भक्ती

ज्याची बांधियली पूजा,
ज्याला आळविले मनी,
फक्त त्याच्या भेटीसाठी
माझी जागती पापणी।

## सारे

सारे तुझ्याचसाठी
काही न येथ माझे...
सारे मिळो, तरीही
होणार नाही ओझे

## प्रीती

कुठली राधा ? कुठले गोकुळ ?
मनात माझ्या हे मधमोहोळ...
स्वप्नसुरंगी परी हिंडते
युगायुगांतील प्रीती होऊन...

## प्रवाही

माझे असुनी माझे नाही
तुझे असुनही तुला न काही
असे कसे हे इथले जगणे
थिजलेले; पण तरिहि प्रवाही...

## जगणे

आयुष्याची गाथा गहिरी
कधी रचियली ? कुणी ? कशास्तव ?
उपद्व्याप केवढा ? पसारा ?
कुणास यातुन तृप्तीचे क्षण !

## पेलणे

माथ्यावरती आभाळ पेलायचं असेल,
तर स्वप्नांचे उखाणे विसरावे लागतात,
आणि स्वप्न पेलायचं असेल, तर ?
तर आभाळालाच उखाणे घालावे
लागतात...

## भविष्य

या ललाटरेषा
बोलुन गेल्या
भाग्य
उद्याचे आज
अन् मनात माझ्या
घुमू लागती
शब्दांचे पखवाज...

## प्रकाश

नक्षत्रांच्या वाती
तेवत्या केल्याशिवाय
काळोखालासुद्धा
प्रवास करता येत नाही.

## जोगवा

कधी सोसते उन्हाळा
कधी पेलते गारवा
त्याच्यातही सुख लाभो
हाच मागते जोगवा

## जाण

घनघोर वादळी या
झाल्या दिशा अनाम
देई धुळीस शक्ती
आगळी, अदम्य जाण

## प्रश्नचिन्ह

तुझ्या पायांवरी
विसावला माथा
तरीही का व्यथा
मनामध्ये ?

तुझ्या नेत्रांमध्ये
गुंतविले मन
तरीही का रण
संपेचिना ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## आज

तुझ्या कटाक्षात
मला तृप्ती, मुक्ती,
मिळेल ‘ उद्याला ’
सगळ्याची शाश्वती

आज पण काय
वणव्यात पाय
मस्तकी वर्षाव
तृषार्त हा जीव...

कधी उजाडेल ?
‘ उद्या ?’ कोण जाणे !
‘आज’ची अतृप्ती
तिला अंत नेणे ! !

## मीच इथे चुकलेली

निजलेली सारी घरे
दिवे उभे पहाऱ्याला
चुकलेला वाटसरू
विचारितो मार्ग मला

मीच इथे चुकलेली
चालणे न मम हाती
सांगू कसे हे त्याला
सांगाया शब्द भीती

वेळ ही अवेळ अशी
थांबू कुठे ? चालू कसे ?
पद माझे अडखळता
वाटहि मज मार्ग पुसे !

निजलेली हीच घरे
उघडतील कधीतरी
घेतील मग कुशीत मला
संपवीन मुशाफिरी...

तोवर पण बंद घरे
चांदणे न सोबतीला
चुकलेल्या वाटसरा,
नेशिल ना पैलतीरा ?

## वाट

वाट तुझ्या घरट्याकडची
मला ज्ञात व्हावी
पंख पसरुनी वेगाने
दिशा ती धरावी...

आज इथे अंधाराने
ग्रासिले परी मी
कणाकणांमधुनी जाते
त्राणही निघोनी...

विस्कळित झाले सगळे
तुझ्यावीण हेतू
सांग कधीं येशी आणि
वाट दाविशी तू ?

## उत्तर

ज्या पावलांवर पाऊल ठेवून चालायचे,
तीच विरून गेली असतील, तर
चालण्याची सक्ती का ?

ज्या हातांनी आभाळ तोलायचे,
ते हातच भक्षक असतील; तर
आभाळ पुसून का नाही टाकायचे ?

ज्याच्या पायांवर मस्तक ठेवायचे
त्याला पायच नसले; तर
मस्तक जपायलाच हवे का ?

—हे आणि असे अनेक प्रश्न
मी तुला विचारले;
आणि तुझ्या नजरेतली निर्विकारता
पाहून
माझ्यातली मीच संपून गेले !

## अगतिक

' तू जसा असशील, तसा अस,
मला फक्त
आधार दे,'
असं म्हणून
मी तुझ्या पायांवर
मस्तक ठेवले...

पण डोळ्यांतून
पाझरणाऱ्या या पाण्याला
मी काय सांगू ?
त्याला कसे थोपवू ?...

## मृत्युगोल

आमंत्रण आलं, की निघावं,
म्हणून तयारी करून बसले होते.
जुने धागे विसरत होते
या जगावर रुसले होते
'तुझ्याकडे येते, येणारच, येऊ ना ?'
जिवाच्या आकांताने विचारले होते.
'ये !' म्हणशील या विश्वासाने
तयारी करून बसले होते.

'येतेस का ?', असं तूही विचारलं होतंस ना, रे!
मी मात्र तत्परतेनें 'येते' म्हटलं होतं.
इथे काय, तिथे काय
सारेच मला सारखे होते...
नवं जग दिसलं असतं,
नव्या वाटा कळल्या असत्या...
निदान याच इथल्या जीवघेण्या
वर्तुळात फिरणं तरी चुकलं असतं.
कुणी चुकचुकलं असतं...
कुणी खचलं असतं...
काहीच झालं नाही, असं समजून
कुणी सुखावलं असतं...
कुणाचं मन फुललं असतं...
कुणाचं झालं असतं उजाड
माझ्यापुढचं निदान मिटलं असतं
एक प्रश्नचिन्हांकित झाड...

पण तसं घडायचं नव्हतं...
माझा आकान्त तुला कळलाच नाही...
तू मला नेलंसच नाहीस...
असं का केलंस ?
असं का केलंस ?
काही कळत नाही...

एकच कळतंय्–
याच मृत्युगोलात
भोवळ येईपर्यंत
नव्या उत्साहाने
भिरभिरत राहिल्याशिवाय
आता दुसरी गती नाही
आता
दुसरी गती नाही...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024003
REFBK-0024003

## नाते

विरून गेले गंध, तरीही
सुवास उधळे माती
पुसल्या वाटेवरी उमटली
हिरवळीची नाती...

कुस्करलेल्या लाख कळ्यांचे
आणिक गंधित श्वास
मला विनविती, ' नकोस शापूस
भविष्यातले भास...'

तुझ्याच हाती तुझेच जगणे
नसते, तरीही असते
असण्या-नसण्या पलिकडचे; पण
जोड स्वत:शी नाते

विझून जातो धूप, तरीही
सुगंधित गाभारा
वेलीसाठी पुनरपि येईल
वसंत मग बहराला...

'छंदयात्री' या काव्य-संग्रहात परखड प्रांजलपणा असला, तरी हे संयत उद्‌गार आहेत.

'चुकलाच, तर चुकू द्यावा ताल...'

पण, देऊ नये कधी सुटू तोल.'

ही या काव्याची मर्यादा आहे. आणि लीलाताईंच्या लौकिक जीवनाचीही !

या कवितेतील स्वप्निल संवेदना स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून चिरंतनाकडे झेपावत आहेत. त्या कृष्णवेड्या राधेशी आपले नाते जोडीत आहेत.

लीलाताईंच्या अनुभूती प्राधान्याने शोकात्मक स्वरूपाच्या आहेत. पहिलेपणाच्या पाऊलखुणा या कविता संग्रहात ठायी ठायी आढळत असल्या, तरी ते 'अस्सल मोती' आहेत. त्यांचा ढाळ लपून राहत नाही.

– अनुराधा पोतदार